अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड


## अंडर १९ विश्वचषक : भारत विरुद्ध ऑस्ट्रेलियामध्ये आज घमासान

मुंबई : रविवारी भारत आणि ऑस्ट्रेलियामध्ये अंडर १९ वर्ल्डकप फायनल होणार आहे. गुरुवारी सेमीफायनलमध्ये ऑस्ट्रेलियाने पाकिस्तानवर थरारक विजय मिळवला.

भारत यापूर्वीच फायनलमध्ये पोहोचलाय. सहा महिन्यात भारत आणि ऑस्ट्रेलिया दुसऱ्यांदा फायनलमध्ये दाखल झाले आहेत. रोहित शर्माच्या नेतृत्वातील भारतीय संघाचा पराभव करत पॅट कमिन्सच्या संघाने जेतेपद मिळवले होते. आता याच पराभवाचा बदला घेण्याची




संधी युवा भारतीय संघाकडे असेल. अंडर-१९ वर्ल्डच्या दुसऱ्या सेमीफायनल सामन्यात ऑस्ट्रेलियाने पाकिस्तानचा एक विकेटनं पराभव केला. अखेरच्या षटकांपर्यंत चाललेल्या रोमांचक सामन्यात ऑस्ट्रेलियाने बाजी मारली. ऑस्ट्रेलियाच्या संघाने संयमाने पाकिस्तानच्या माऱ्याचा सामना करत फायनलमध्ये प्रवेश केला. आता ११ फेब्रुवारी रोजी भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यामध्ये विलोमूर पार्कमध्ये अंतिम लढत होणार आहे. सहा महिन्याच्या आत दुसऱ्यांदा भारत आणि ऑस्ट्रेलिया जेतेपदासाठी भिडणार आहेत. २०२३ मध्ये वनडे विश्वचषकाच्या अंतिम फेरीत भारत आणि ऑस्ट्रेलियाचा सामना झाला होता. त्या सामन्यात कमिन्सच्या ऑस्ट्रेलियाने भारताचा पराभव करत विश्वचषक उंचावला होता.


www.surajyadigital.com ■ शनिवार, दि.१० फेब्रुवारी २०२४ ■ ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : १३२ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८


# प्रणिती शिंदेंच्या साम्राज्याला भाजपचा सुरुंग

## सोलापूर शहर 'मध्य'च्या वर्चस्वासाठी फोडाफोडीचे भयावह राजकारण

- मोची समाज फोडण्यासाठी विजयपुरातून हालचाली
- खासदार रमेश जिगाजिनागी यांच्या मध्यस्ती
- शिंदे एकनिष्ठ माजी नगरसेवकांची ओढाओढी

सुराज्य/शिवाजी भोसले

**आमदार प्रणिती शिंदे यांनी काँग्रेससोबत कायम राहण्याची भूमिका स्पष्ट केल्यानंतर भाजपने आपला नूर बदलला आहे. प्रणिती शिंदे यांचे साम्राज्य असलेल्या सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदार संघालाच सुरुंग लावण्यासाठी भाजपने मोठ्या हालचाली सुरू ठेवल्या आहेत. काँग्रेस पर्यायाने सुशीलकुमार आणि प्रणिती शिंदे यांच्या पाठीशी आजवर राहिलेल्या मोची समाजाच्या हाती 'कमळ' देऊन या समाजाची मोठी ताकद भाजप मिळविण्यासाठी प्रयत्नशील आहे. या समाजासह नेतृत्वाचे चेहरे भाजपत आणण्यासाठी माजी केंद्रियमंत्री आणि विजयपूरचे खासदार रमेश जिगाजिनागी यांची मध्यस्थी सुरू आहे.**








विशेष म्हणजे, प्रणिती शिंदे यांचे साम्राज्य खालसा करताना त्यांच्याशी एकनिष्ठ असलेल्या अन्य समाजाच्या माजी नगरसेवकांसह काँग्रेसचे नेते, पुढारी, पदाधिकाऱ्यांना भाजपात आणण्यासाठी मोठे प्रयत्न सुरू आहेत. हे प्रयत्न फळाला येणार असल्याचे खात्रीलायकरीत्या सांगण्यात आले. मुख्यत्वे, मोची समाजाच्या ५-६ नगरसेवकांसह साधारण सव्वा ते दीड लाखाचा हा समूह भाजपने आपल्या पाठीशी घेतल्यास, माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे आणि त्यांच्या कन्या आमदार प्रणिती शिंदे यांच्या नेतृत्वाला मोठा धक्का बसणार आहे. प्रणिती शिंदे यांनी भाजपची ऑफर नाकारल्यानंतर शिंदे पिता कन्येस हा 'दे धक्का' मानण्यात येत आहे. शिंदे पिता -कन्येची मोची समाजाची हक्काची व्होट बँक भाजप मिळवीत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भाजपमध्ये मोची समाजाला घेण्याच्या धर्तीवर, खासदार रमेश जिगाजिनागी यांनी मोची समाजाचे नेतृत्व करणाऱ्या सोलापुरातील नेतेमंडळींसमवेत बैठका घेऊन प्रवेशाच्या चर्चेच्या फैरी झडविल्या आहेत.

### काही हायलाईटस्...

- सोलापुरातील मोची समाजामधील युवकांमध्ये मोदी पर्यायाने भाजप नेतृत्वाबद्दल क्रेझ
- अयोध्येतील श्रीराम प्रतिष्ठापणेच्या पार्श्वभूमीवर, सगळ्यात जादा कार्यक्रम सोलापुरात मोची समाजात
- सोलापुरातील मोची समाजामध्ये 'जय श्रीराम, हर हर मोदी'चा नारा
- आंध्रप्रदेश आणि तेलगंणमधील मोची समाजाची ताकद भाजपच्या पाठिशी
- भाजपच्या पाठीशी राहण्याचा आंध्र-तेलगंण पॅटर्न राबू शकतो सोलापुरात



देशाचे नेतृत्व करण्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशिवाय देशासमोर चेहराच नाही. मोदी हीच नेतृत्वाची गॅरंटी आहे. सर्वत्र मोदींच्या नेतृत्वाचा माहोल आणि लोकप्रियतेचा माहोल आहे. शहर मध्य सह अन्य ठिकाणचे माजी नगरसेवक, पदाधिकारी, नेते हे भाजपमध्ये येण्यास इच्छुक आहेत. सर्वांना सन्मानाने पक्षात घेणार आहोत.शहर मध्यमधून भाजपमध्ये प्रवेश करणाऱ्यांची यादी मोठी आहे. बोटावर मोजण्याइतपतदेखील माजी नगसेवक काँग्रेसमध्ये राहतील असे वाटत नाही.

**- नरेंद्र काळे, शहराध्यक्ष, भाजप सोलापूर**



काँग्रेस सोडून भाजपमध्ये जाण्याचा निर्णय झालेला नाही. मात्र, समाजाच्या काही मागण्यांच्या पूर्ततेच्या पार्श्वभूमीवर, आम्ही समाजाचे प्रतिनिधी खासदार रमेश जिगाजिनागी यांच्याकडे विजयपूरला गेलो होतो. तिथे भाजप प्रवेशाची चर्चा झाली. यासंदर्भात समाजाची बैठक होणार आहे.

**- संजय हेमगड्डी, माजी महापौर, तथा मोची समाजाचे नेते**



खासदार रमेश जिगाजिनागी यांच्याशी विजयपुरात चर्चा झाली आहे. मोची समाजाच्या भाजप प्रवेशाचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला आहे. साधक-बाधक चर्चा झाली आहे. या समाजाला योग्य तो न्याय, नेतृत्व मिळाल्यास भाजपमध्ये प्रवेश करण्याला हरकत नसल्याची युवकांची भावना आहे. अद्याप निर्णय झालेला नाही. या संदर्भात बैठका होतील. चर्चा होईल. मध्यस्ती करणारे खासदार रमेश जिगजेनी यांच्याशीदेखील अजून चर्चा होऊ शकते. तेलंगण-आंध्रप्रदेश येथील मोची म्हणजे मादिगा समाजाचे नेतृत्व करणाऱ्या मंदाकृष्णा मादिगा यांनादेखील आम्ही भाजप प्रवेशाच्या पार्श्वभूमीवर भेटणार आहोत.

**- देवेंद्र भंडारे, माजी सभागृह नेते, मोची समाजाचे नेते**



## चौधरी चरणसिंह, नरसिंह राव, स्वामीनाथन यांना सर्वोच्च सन्मान

सुराज्य/नवी दिल्ली

भारत सरकारने एकाच वेळी तीन दिग्गजांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित केले आहे. चौधरी चरण सिंह, नरसिंह राव आणि एमएस स्वामिनाथच यांना भारतरत्न पुरस्काराने गौरवण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्वीट करत याबाबतची माहिती दिली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एकापाठोपाठ एक तीन ट्वीट करत याबाबतची माहिती दिली. गेल्या आठवड्यात भारत सरकारने माजी उपपंतप्रधान लाल कृष्ण आडवाणी यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित केले होते.

एकाच आठवड्यात चार दिग्गजांना भारतरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलेय. भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार आहे.

## जूनपासून राज्यातील मुलींना मोफत उच्च शिक्षण मिळणार

### मेडिकल, इंजिनिअरिंगसह ६०० अभ्यासक्रम

मुंबई : मुलींच्या शिक्षणासंदर्भात महत्त्वाची बातमी येत आहे. येत्या जूनपासून राज्यात ज्या मुलींच्या पालकांचे आठ लाखांपेक्षा कमी उत्पन्न आहे त्यांना मेडिकल असो की इंजिनिअरिंग जवळपास ६०० अभ्यासक्रमांचे शिक्षण मोफत दिले जाणार आहे. राज्याचे उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी ही घोषणा केली आहे.



कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पाटील यांनी ही घोषणा केली आहे. या योजनेत ६०० वेगवेगळे अभ्यासक्रम घेण्यात आले आहेत. इंजिनिअरिंग, मेडिकल सारख्या अभ्यासक्रमांना पालकांचे लाखो रुपये खर्च होतात. सामान्य घरातील मुलींच्या शिक्षणाची दारे उघडणार आहेत. याचबरोबर चंद्रकांत पाटलांच्या घोषणेनंतर मुलांमध्ये नाराजी पसरली आहे. फक्त मुलींनाच मोफत का, या मुलांना देखील मोफत करावे अशी मागणी केली.

## पाकिस्तानात नवाज शरीफ यांची सरकार स्थापनेची घोषणा

नवी दिल्ली : गेल्या दोन दिवसांपासून शेजारील देश पाकिस्तानमध्ये निवडणुकीची धूम सुरू आहे. काल रात्र आणि आज दिवसभरापासून सुरू असलेली मतमोजणी अंतिम टप्प्यात असून इम्रान खान यांच्या पक्षासोबतच नवाझ शरीफ यांनीही आपल्या पक्षाच्या विजयाचे मोठे दावे केले आहेत. दरम्यान, माजी पंतप्रधान आणि पाकिस्तान मुस्लिम लीग-नवाझ (पीएमएल-एन) चे सर्वे सर्वा नवाझ शरीफ यांनी सार्वत्रिक निवडणुकीनंतर त्यांचा पक्ष 'सिंगल लार्जेस्ट पार्टी' म्हणून उदयास आल्याचे म्हटले आहे.



मतमोजणीदरम्यान माजी पंतप्रधान नवाझ शरीफ यांनी आपल्या समर्थकांना संबोधित केले. यावेळी त्यांनी पाकिस्तानमध्ये नवीन सरकार स्थापन करण्याची घोषणा केली आहे. पक्ष स्वबळावर सरकार स्थापन करू शकत नाही, असेही ते यावेळी म्हणाले. त्यांच्या या घोषणेनंतर पाकिस्तानमध्ये सरकार स्थापनेचे प्रयत्न अधिक तीव्र झाले आहेत. इम्रान खान यांच्या पक्षावर निवडणूक आयोगाने बंदी घातल्यामुळे बहुतांश उमेदवारांनी अपक्ष निवडणूक लढवली होती, त्यामुळे आता पाकिस्तानचे भविष्य अपक्षांच्या हाती असणार आहे.

## चोरट्यांनी बनावट चावीने मालवाहतूक ट्रक पळवला

सुराज्य/सांगोला

ट्रक मालक घरात झोपल्याची संधी साधून अज्ञात चोरट्यांनी बनावट चावीने १२ टायरचा मालवाहतूक ट्रक चालू करून पळवून नेला. ही घटना घेरडी (ता. सांगोला) येथे रोहन कुमार साळुंखे यांच्या घरानजीक घडली. याबाबत ट्रकमालक सागर भिवा पवार (रा. शेगाव रोड हनुमाननगर, जत जि. सांगली) यांनी फिर्याद दिली आहे.

फिर्यादी सागर पवार यांच्याकडे तीन ट्रक असून ते आणि भाऊ चालवतात. ते जतमधून (के.ए. २२ / सी. २२७२) या १२ टायर ट्रकमध्ये विटा भरून घेरडी येथे घेऊन निघाले होते. त्यांचे नातेवाईक रोहनकुमार साळुंखे यांच्याकडे ट्रकमधील विटा उतरविल्या. त्यानंतर ट्रक काही अंतरावर रोडवर दरवाजे लॉक करून उभा केला. घरी झोपले असताना चोरट्याने ट्रक पळवला.

# श्रेष्ठी म्हणाले; सोलापूरकरानांच उमेदवाराबद्दल घाई!

## यथावकाश होईल घोषणा; ऑन ग्राऊंड रिपोर्ट महत्वाचा

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




जानेवारीनंतर डायरेक्ट एप्रिल–मे सुरू झालं की काय ?


कल्याण
189-87-700

मुंबई
123-65-357


सुराज्य/खास प्रतिनिधी

**साधारणपणे एप्रिलच्या मध्यावर लोकसभेची निवडणूक होणार हे निश्चित मानून भाजपची निवडणुकीची तयारी सुरू आहे. उमेदवारी नेमकी कोणाला द्यायची, याचा निर्णय ऑन ग्राऊंड रिपोर्टच्या आधारे होणार आहे. यथावकाश उमेदवारांची यादी घोषित होईल, महाराष्ट्रात कोठेच नाही, पण सोलापूरकरांना उमेदवाराबद्दल घाई झाली आहे, या शब्दात भाजपच्या मुंबई स्थित उच्च पदस्थ सूत्राने आज शुक्रवारी (ता. ९) भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांना सांगितले.**





लोकसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, मार्च महिन्यात आचारसंहिता लागेल अशी परिस्थिती आहे. त्यादृष्टीने, निवडणूक विभाग तयारीत आहे. दुसऱ्या बाजूला राजकीय हालचालीसुद्धा गतिमान झाल्या आहेत. सोलापूर लोकसभेचा उमेदवार कोण? यावर आता सर्वांचे लक्ष केंद्रित झाले आहे. आमदार प्रणिती शिंदे यांची संभाव्य उमेदवारी गृहीत धरून काँग्रेसवाल्यांनी काम सुरू ठेवले आहे.तुलनेत, भाजपचीदेखील निवडणुकीसाठी जोरदार मुसंडी असली तरी उमेदवारीचा चेहरा समजत नसल्याने संभ्रम कायम आहे. प्रत्येक ठिकाणी 'सोलापूर लोकसभेचा चेहरा कोण?' या भोवतीच चर्चा रंगत आहे. दरम्यान, भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्याने प्रदेश पातळीवरील एका उच्च पदस्थ नेत्यास भ्रमणध्वनीवर संपर्क साधून उमेदवारीबद्दल विचारले असता उपरोक्त उत्तर संबंधित नेत्याने दिल्याचे सांगण्यात आले. दिनांक १७ आणि १८ फेब्रुवारीला भाजप शहर आणि जिल्हाध्यक्ष यांची बैठक बोलविण्यात आली आहे, या बैठकीत उमेदवारीचा अंदाज येऊ शकतो.

### भाजपमधून इच्छुक असलेल्यांची लांबलचक यादी...

आमदार विजयकुमार देशमुख, प्रा. नारायण बनसोडे, माजी खासदा अमर साबळे, रयत परिषदेच्या अध्यक्षा कोमल साळुंके-ढोबळे, माजीमंत्री लक्ष्मण ढोबळे, माजीमंत्री दिलीप कांबळे, सनदी अधिकारी भारत वाघमारे, विद्यमान खासदार डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामी, माजी खासदार ॲड. शरद बनसोडे, रामचंद्र साळे, दिलीप शिंदे, डॉ. सचिन कोरे, भिवंडीचे बी.जी शिंदे, मुंबईच्या माजी नगरसेविका जयश्री खरात, सोलापूरच्या माजी नगरसेविका संगीता जाधव, उद्योजक राजेश मुगळे आदी.

### उमेदवारीसंबंधी पक्षश्रेष्ठींपुढे सर्वात सक्षम असणारे चेहरे

सोलापूर लोकसभा मतदार संघामधून भाजपतर्फे निवडणूक लढविण्यासाठी अनेकजण इच्छुक आहेत. इच्छुकांची यादी आता लांबलकच झाली आहे. परंतु, उमेदवारी देण्याच्या पार्श्वभूमीवर, सर्वात आघाडीवर आमदार विजयकुमार देशमख (जात प्रमाणपत्राची अडचण नसेल तर), सनदी अधिकारी भारत वाघमारे ( मुळ रहिवासी हिरज ता. उत्तर सोलापूर सध्या कार्यरत रायगड जिल्हा पुनर्रवसन अधिकारी, प्रा. नारायण बनसोडे, रयत परिषदेच्या प्रदेशाध्यक्षा कोमल सांळुके-ढोबळे

### स्थानिक उमेदवाराचा दावा

आरक्षित सोलापूर लोकसभेच्या जागेवरुन लढण्यासाठी पुणे-मुंबईसह अन्य ठिकाणहून अनेकजण इच्छुक आहेत. या संबंधितांनी उमेदवारीची मागणी भाजप पक्षाकडे केली असली तरी सोलापूर लोकसभेचा उमेदवार हा स्थानिक असेल, गेटकेन चेहऱ्याला संधी मिळणार नाही, असे आज शुक्रवारी सोलापूरी भाजपच्या वजनदार आणि निर्णय प्रक्रियेत असलेल्या एका पदाधिकाऱ्याने दै. 'सुराज्य' ला सांगितले.

### 'ताई' है तो गॅरंटी है !

सोलापूर लोकसभेची निवडणूक प्रणिती शिंदे यांनीच लढवावी, असा आग्रह आहे. या अनुषंगानेच, आमदार प्रणिती शिंदे यांनाच पक्षाने उमेदवारी द्यावी, असा ठराव काँग्रेस शहर-जिल्हा समितीच्यावतीने करुन प्रदेश काँग्रेसकडे पाठविण्यात आला आहे. प्रणिती शिंदे यांच्याच उमेदवारीसाठी सर्वांची पसंती आहे. 'ताई' है तो गॅरंटी है ! असाच नारा काँग्रेसच्या वर्तुळात आहे.